# प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे
# मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स
# गणेशखिंड, पुणे ५३

## गुणवंत विद्यार्थी पुरस्कार

प्रो. ए. सोसायटीच्या मॉडर्न कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अँड कॉमर्स, गणेशखिंडतर्फे **२०१२ - १३** या शैक्षणिक वर्षात देण्यात येणाऱ्या **'गुणवंत विद्यार्थी पुरस्कारासाठी'** महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनींकडून अर्ज मागवण्यात येत आहेत.

**पात्रता व निकष** :

- क्रीडा प्रकार / कला मंडळ / राष्ट्रीय सेवा योजना (NSS) /एन सी सी (NCC) अशा उपक्रमात सहभागी झालेले विद्यार्थी
- बीएस्ससी, बीकॉम, बीए, बीबीए, बीसीए तसेच एमएस्ससी, एमकॉम, एमए, एमसीएतील द्वितीय व तृतीय वर्षातील विद्यार्थी या पुरस्कारासाठी अर्ज करू शकतात.
- अर्ज करणारे विद्यार्थी नियमितपणे वर्गात उपस्थित राहणारे आणि चांगले वर्तन असणारे असावेत.
- अर्ज करणा-या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात किमान एक शैक्षणिक वर्ष पूर्ण केलेले असावे.
- अर्ज करणारे विद्यार्थी मागील शैक्षणिक वर्षातील प्रत्येक सत्रात सर्व विषयात पहिल्या प्रयत्नात उत्तीर्ण झालेले असावेत.

**गुणवंत विद्यार्थी पुरस्कारासाठी खालील प्रकारातील कामगिरी विचारात घेतली जाईल** :

- शैक्षणिक कामगिरी

मागील शैक्षणिक वर्षात कला शाखेतील विद्यार्थ्यांनी किमान ५० %, वाणिज्य शाखेतील विद्यार्थ्यांनी किमान ५५ %, शास्त्र शाखेतील विद्यार्थ्यांनी किमान ६० % गुण मिळवलेले असावेत.

- महाविद्यालयासाठीचे योगदान

क्रीडा प्रकार / कला मंडळ / राष्ट्रीय सेवा योजना (NSS) /एन सी सी (NCC) अशा उपक्रमातून महाविद्यालयाचे प्रतिनिधीत्व केलेले विद्यार्थी यासाठी अर्ज करू शकतात. अशा विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षात किमान ५० % गुण मिळवलेले असावेत.

- आपल्या महाविद्यालयातर्फे अथवा इतर संस्थांनी आयोजित केलेल्या उपक्रमात सहभाग घेऊन विशेष पुरस्कार किंवा प्रावीण्य मिळवलेले विद्यार्थी यासाठी पात्र आहेत.

**अर्ज भरण्याची प्रक्रिया** ः

- इच्छुक विद्यार्थी / विद्यार्थिनींनी दि. १७ ते २९ डिसेंबर २०१२ या कालावधीत महाविद्यालयाच्या सूक्ष्मजीवशास्त्र विभाग, कला, वाणिज्य, शास्त्र शाखेच्या उपप्राचार्याकडून अर्ज घेऊन जावेत.
- विभाग प्रमुख, क्रीडा संचालक, विभाग समन्वयक, कार्यक्रम अधिकारी यांच्यामार्फत या पुरस्कारासाठी अर्ज करता येतील.
- विद्यार्थ्यांनी पूर्ण भरलेले अर्ज व आवश्यक कागदपत्रांच्या फोटोकॉपीज आपापल्या शाखेच्या उपप्राचार्यांकडे दि. २९ डिसेंबर २०१२ रोजी दुपारी १२ वाजेपर्यन्त जमा करावेत.

**गुणवंत विद्यार्थी / विद्यार्थिनींची निवड करण्यासाठीचे वेळापत्रक** ः

अर्ज भरण्याची मुदत ः दि. १७ ते २९ डिसेंबर २०१२

अर्ज पडताळणी ः जानेवारी २०१३ चा पहिला आठवडा

लेखी परीक्षा ः जानेवारी / फेब्रुवारी २०१३

मुलाखत ः जानेवारी / फेब्रुवारी २०१३

लेखी परीक्षा व मुलाखतीची तारीख आणि वेळ वेळोवेळी सूचनाफलकावर लावली जाईल.

**सौ. स्नेहा ओगले**
अध्यक्षा, गुणवंत विद्यार्थी पुरस्कार समिती

**डॉ. संजय खरात**
प्राचार्य